डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० / २६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./BANRF/सूचना/ २०२५-२०२६/ २५६२

दिनांक ०८/०४/२०२५

# सूचना

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) पोर्टल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे मार्फत अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना पीएच.डी. या उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. विद्यार्थ्यांना BANRF अधिछात्रवृत्ती योजनेचा अचूक लाभ अनुदेय करण्यासाठी पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. पोर्टलच्या अनुषंगाने दिनांक १८/०३/२०२५ रोजी बार्टीच्या संकेतस्थळावर BANRF-२०२१ व BANRF-२०२२ मध्ये विद्यार्थ्यांनी दिनांक १५/०४/२०२५ पर्यंत अधिछात्रवृत्ती पोर्टलवर login करणे करिता घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. तथापि, BANRF-२०२१ अंतर्गत एकूण पात्र ७९५ विद्यार्थ्यांपैकी २३७ विद्यार्थ्यांनी Login केले आहे पैकी १०६ विद्यार्थ्यांनी अपूर्ण फॉर्म भरले आहेत. तसेच BANRF-२०२२ अंतर्गत ७६३ विद्यार्थ्यांपैकी एकूण १९९ विद्यार्थ्यांनी login केले असून ९२ विद्यार्थ्यांनी त्यांचे फॉर्म अपूर्ण भरले आहेत. BANRF अंतर्गत सर्व पात्र विद्यार्थ्यांनी त्यांचे login करणे अनिवार्य असताना देखील अत्यंत कमी विद्यार्थ्यांनी login करून संपूर्ण माहिती भरली आहे.

सदर घोषणापत्राद्वारे विद्यार्थ्यांना असे आवाहन करण्यात येते की, दिनांक १५/०४/२०२५ पर्यंत खालील क्रमाने सर्व माहिती पोर्टलमध्ये अद्ययावत करावी जेणेकरुन कार्यालयास पुढील प्रक्रिया राबविणे सोईचे होईल.

**पोर्टल बाबत महत्वाच्या बाबी:-**

१) http:/27.1074.122:85 या लिंकवर Login Signup करावे
२) Login करुन तुमची वैयक्तीक, पीएच.डी. बाबत संशोधनाबाबत सर्व माहिती पोर्टल मध्ये भरणे आवश्यक आहे.
३) प्रोफाईल मध्ये नमूद सर्व आवश्यक गोष्टी * (स्टार) ने नमूद करण्यात आलेल्या बाबी बाबत तपशील भरणे अत्यंत आवश्यक आहे.
४) कोणत्याही प्रकारची खोटी माहिती किंवा अनावश्यक माहिती भरु नये.
५) कागदपत्र upload करताना त्याबाबत देण्यात आलेल्या सर्व आवश्यक सूचनांचे विद्यार्थ्यांनी पालन करावे.

BANRF पोर्टल बाबत विद्यार्थ्यांना येणा-या तांत्रिक अडचणी बाबत आपण **मोबाईल नंबर ९५२९९१५२११४ सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत संपर्क करावा.**

उसोनवणे

**(उमेश सोनवणे)**
**विभागप्रमुख-अधिछात्रवृत्ती**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे**